नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे
Year - 3rd
अंक - ११०
Issue - 110
वार शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५
Blow- Saturday Date 6 September 2025
ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com
वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com
पाने - ४
Pages - 4
किंमत - ४.०० रुपये
Amount - 4 /- Rs
पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी समिती सदस्यांची नियुक्ती

## राज्य सरकारकडून नेमणुकीसंदर्भातील शासन निर्णय जारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात त्रिभाषा धोरणावरुन वाद निर्माण झाला होता. तिसरी भाषा म्हणून हिंदी सक्तीला कडाडून विरोध करण्यात आला. राज्यातील शैक्षणिक संघटनांसह अनेक पक्षांनी राज्य सरकारच्या त्रिभाषा सुत्राविरोधात आक्रमक पवित्रा घेतला. मनसेसह शिवसेना ठाकरे गटाने याविरोधात मोठे आंदोलन उभारले. राज्यात विरोधाची धार वाढतानाचे पाहून सरकारने त्रिभाषा सुत्राचे दोन्ही जीआर मागे घेतले. आणि सुत्रावर पुर्नविचार करण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्ती केली. याबाबत आता मोठी बातमी समोर येत आहे. या त्रिभाषा धोरण निश्चितीसाठी जाधव समितीतील सदस्यांनी नेमणूक करण्यात आली आहे. राज्य सरकारने या नेमणुकीसंदर्भातील शासन निर्णय जारी केला आहे.



समितीतील सदस्य कोण?

१. डॉ. नरेंद्र जाधव (समिती प्रमुख) २. डॉ. सदानंद मोरे (माजी अध्यक्ष, भाषा सल्लागार समिती) ३. डॉ. वामन केंद्रे, (संचालक, नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा) ४. डॉ. अपर्णा मॉरिस, (शिक्षणतज्ज्ञ, पुणे) ५. श्रीमती सोनाली कुलकर्णी जोशी, (भाषा विज्ञान प्रमुख, डेक्कन कॉलेज, पुणे) ६. डॉ. मधुश्री सावजी, (शिक्षण-तज्ज्ञ, छत्रपती संभाजीनगर) ७. डॉ. भूषण शुक्ल, (बालमानसतज्ज्ञ, पुणे) ८. श्री. संजय यादव, (राज्य प्रकल्प संचालक, समग्र शिक्षा अभियान, मुंबई) (सदस्य सचिव)

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन दिनांक ३० जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने समिती सदस्यांची नियुक्ती करण्याची बाब शासनाच्या विच-ाराधीन होती. त्यास अनुसरुन शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

दरम्यान राज्य सरकारच्या त्रिभाषा धोरण सुरुवातीपासूनच वादाच्या भोवऱ्यात अडकले हो-ते. त्यात पहिलीपासून हिंदी सक्ती केल्याने हा वाद उफाळला आहे. या शासननिर्णयाविरोधात जनमानसात रोष पाहायला मिळाला. तर अनेक संघटनांनी आणि मनसेने आक्रमकपणे शासन निर्णयाविरोधात पवित्रा घेतला. मनसेने तर याविरोधात मोठे आंदोलनही उभारले, ज्याला नंतर शिवसेना ठाकरे गटाचाही पाठिंबा मिळाला. त्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापलेले पाहायला मिळाले. वाढता विरोध पाहता सरकारने दोन्ही शासन निर्णय मागे घेतले.

त्रिभाषा धोरणाच्या अभ्यासासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याच समितीमधील सदस्य आज नियुक्त करण्यात आले. समिती आपला सविस्तर अहवाल सादर करेल.

# भारत अन् रशियाला आम्ही गमावलंय!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वॉशिंग्टन: भारत आणि रशियासोबतचे संबंध संपत आल्याचं दिसू लागले आ-हेत, असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केलं आहे. ट्रम्प यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट लिहिली आहे. अमेरिकेनं भारत आणि रशिया ला गमावलंय. हे दोन्ही देश चीनच्या जवळ गेले आहेत, असं ट्रम्प यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. या पोस्ट सोबत त्यांनी शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर संमेलनाचा फोटो सोबत जोडला आहे. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे अध्यक्ष व्लादीमीर पुतीन आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग सोबत दिसत आहेत. ट्रम्प यांनी सोशल मिडिया पोस्टच्या माध्यमातून भारत आणि रशिया सोबतचे संबंध संपवण्याचे संकेत दिले आहेत.



**तीन बड्या नेत्यांचा फोटो पोस्ट करत डोनाल्ड ट्रम्प यांचे मोठे विधान**

डोनाल्ड ट्रम्पयांनी शुक्रवारी ट्रूथ सोशलवर एक पोस्ट केली. 'भारत आणि रशियाला आम्ही सर्वात अंधकारमय चीनच्या हस्ते गमावलंय. देव करो त्यांचं भविष्य समृद्ध हो!', असं ट्रम्प यांनी एससीओ संमेलनाचा फोटो शेअर करत म्हटलं आहे. रशिया आणि भारत हे दोन मोठे देश चीनच्या बाजूनं झुकलेले आहेत. ते पाहता अमेरिका आता या दोन्ही देशांसोबतचे संबंध संपवण्याच्या विचारात आहे. ट्रम्प यांच्या पोस्टनं याबद्दलचे संकेत मिळाले आहेत. ट्रम्प यांच्या पोस्टवर परराष्ट्र मंत्रालयानं कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताविरोधात आक्रमक पवित्रा घेतला आहे. अमेरिकन सरकारनं भारतावर ५० टक्के ट्ररिफ लादला आहे. त्यामुळे दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. तर रशियासोबत युक्रेन युद्धामुळे अमेरिकेचे संबंध ताणले गेलेले आहेत. याच घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतीन आणि पंतप्रधान मोदी यांनी याच महिन्याच्या सुरुवातीला चीन चा दौरा केला. चीन, रशिया आणि भारत अशा मोठ्या देशांचे प्रमुख एससीओच्या बैठकीत एकत्र आले. त्यांच्यात विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.

एससीओच्या शिखर संमेलनासाठी मोदी आणि पुतीन चीनला पोहोचले होते. दोन्ही नेत्यांनी चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांची भेट घेतली. भारत, रशिया आणि चीनच्या राष्ट्र प्रमुखांची भेट अमेरिकेला उत्तर देणारी मानली गेली. मोदी यांनी चीन दौरा करुन ट्रम्प यांना इशारा दिल्याचं तज्ज्ञ सांगतात. ट्रम्प यांची सोशल मिडिया पोस्ट पाहता त्यांनी मोदी, जिनपिंग आणि पुतीन यांच्या भेटीचा धसका घेतल्याचं दिसतं.

ट्रम्प प्रशासनानं भारतावर ५० टक्के टॅरिफ लादला आहे. त्यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध बिघडले आहेत. अमेरिकेनं भारतावर २५ टक्के बेस टॅरिफ लादला. रशियन तेलाची आयात करत असल्यानं २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादला गेला. त्यामुळे एकूण टॅरिफ ५० टक्क्यांवर गेलं. रशियाकडून खनिज तेलाची खरेदी करत असल्यानं अमेरिकेनं भारतीय वस्तूंवर अतिरिक्त टॅरिफ लादण्याचा इशारा दिला होता. २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादत ट्रम्प प्रशासनानं भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न केला.

### रविवारचा अंक नाही

अनंत चतुर्दशीनिमित्त आज शनिवार, ६ सप्टेंबर २०२५ रोजी दैनिक यश सिद्धि न्यूज कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या रविवार, ७ सप्टेंबर २०२५ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार, विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

# 'ओबीसींच्या योजनांवर पवारांनीच मर्यादा आणल्या,' लक्ष्मण हाकेंचा जोरदार हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बारामती : ओबीसी संघटनेचे नेते लक्ष्मण हाके यांनी आज बारामतीत मोर्चा काढला. या मोर्चात राज्य सरकार पेक्षाही त्यांचे सर्वाधिक लक्ष्य पवार कुटुंबीयच होते. शरद पवार सुप्रिया सुळे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि रोहित पवार यांनाही हाके यांनी धारेवर धरले. बारामतीत आज ओबीसी आरक्षण बचावासाठी ओबीसी बांधवांचा भव्य मोर्चा पार पडला. यावेळी हाके बोलत होते. हाके म्हणाले, कोणत्याही पक्षाची सत्ता आली तरी अर्थमंत्री अजित दादा पवार असतात. गावगाड्यात ओबीसी ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, पण आम्हाला १ टक्क्याच्या पुढे तरतूद झालेली नाही. शरद पवार यांनी मनोज जरांगे नावाचं भुत महाराष्ट्राच्या मानगुटीवर बसवलं. अजितदादांनी वसंतराव नाईक महामंडळाला अजिबात पैसे दिले नाहीत, मात्र अण्णासाहेब पाटील महामंडळाला एकट्या बारामती अर्बन बँकेतून १६२ कोटी रुपये देऊ केले. वसंतराव नाईक महामंडळाची मात्र तीन लाखांची कर्ज मंजूर करण्यात आले नाही. सारथीचे पालकत्व अजित पवारांनी घेत-ले तिला शेअर मार्केट सारखी बिल्डिंग उभी केली. मात्र आम्हाला एक हजार चौरस फुटाचे कार्यालय दिले. सारथीच्या पोरांना १०-१० लाख पीएचडीसाठी दिले. मराठा समाज आणि ओबीसी आरक्षण काय संबंध? असा सवाल करत हाके यांनी मनोज जरांगे यांची भेट घेणाऱ्या खासदार सुप्रिया सुळे, बजरंग सोनवणे यांच्यावर टीका केली. रोहित पवारांसह अजित पवारांचे आमदारही जरांगेंच्या मदतीला होते, असा देखील आरोप करून फक्त एका प्रतिज्ञापत्राद्वारे जात बदलणार असल्याचा जीआर सरकारने काढला आहे. बारामतीत आमराई परिसरात मी जाणार आहे. तिथून जरांगेंना शिदोरी पाठवली होती, पण ती नाकारली होती. तिथली माती मी मस्तकाला लावणार असल्याचे म्हणत हाकेंनी 'मंडल आयोग शरद पवार यांनी लागू केला, असं कोणी म्हटलं तर त्याचं कानफाड फोडा' असे म्हटले आहे.

# न्या. चंद्रशेखर यांनी घेतली मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती न्या. श्री चंद्रशेखर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ती पदाची शपथ घेतली.




राजभवन येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभामध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्या. चंद्रशेखर यांना पदाची शपथ दिली. शपथ दिल्यानंतर राज्यपालांनी व त्यांच्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी न्या. चंद्रशेखर यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

शपथविधी सोहळ्याला विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, लोकायुक्त न्या. (नि.) विद्यासागर कानडे तसेच राजस्थान, झारखंड, दिल्ली, अलाहाबाद, कर्नाटक व मुंबई उच्च न्यायालयातील न्यायाधीश व सेवानिवृत्त न्यायाधीश उपस्थित होते.

सुरुवातीला राज्याचे मुख्य सचिव राजेश कुमार यांनी न्या. चंद्रशेखर यांच्या नियुक्तीबाबत केंद्र सरकारची अधिसूचना वाचून दाखवली. शपथविधी सोहळ्याची सुरुवात राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

**'फार्मर कप' द्वारे १५ हजार शेतकरी उत्पादक गट तयार करण्याचे उद्दीष्ट**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस;राज्य शासन आणि पानी फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम**

# राज्यातील सर्व तालुके आणि गावांमध्ये होणार 'फार्मर कप' उपक्रमाची अंमलबजावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील सर्व तालुके आणि गावांमध्ये राज्य शासन व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'फार्मर कप' या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी कृषी विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य शास-नाची उच्चस्तरीय समिती व पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राज्यात २०२६-२७ या वर्षासाठी १५ हजार शेतकरी उत्पादक गट तयार करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, उत्पादित शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे. शेतीमध्ये उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध पातळीवर अनेक उपाययोजना करत आहे. २३ मार्च २०२५ रोजी झालेल्या पाणी फाउंडेशनच्या वार्षिक कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रात सत्यमेव जयते फार्मर कप ची घोषणा करण्यात आली. सत्यमेव जयते फार्मर कप या उपक्रमाला व्यापक स्वरूपात राबविण्यासाठी राज्य शासन पाणी फाउंडेशनला सहकार्य करेल. फार्मर कप या उपक्रमाला राज्य शासनाशी जोडल्याने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मदत होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देखील शेतकरी उत्पादक संघटना तसेच शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलत आहेत. विकसित महाराष्ट्र २०४७ मध्ये कृषी विकासाला अत्यंत महत्त्व देण्यात आले आहे. त्याच दृष्टीने राज्यातील हा उपक्रम देखील महत्वपूर्ण ठरेल, असे मुख्यमंत्री यांनी सांगितले.

पाणी फाउंडेशनने २०२१ पासून सत्यमेव जयते फार्मर कप या उपक्रमाच्या माध्यमातून ५० हजाराहून अधिक शेतकऱ्यांना शेतकरी गटात संघटित केले आहे. यापैकी जवळपास अर्धे गट महिला शेतकऱ्यांचे असल्यामुळे, हा उपक्रम महिला सक्षमीकरणासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरला आहे. सध्या, हा उपक्रम महाराष्ट्रातील ४६ तालुक्यांमध्ये आयोजित केला जातो. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. तरीही, ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी शेतीमध्ये सामूहिकीकरणासाठी लोकचळवळीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हा आणि गावात विस्तार करण्याची क्षमता आणि गरज आहे.




**'फार्मर कप' ला लोकचळवळ बनवून शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्नशील – आमीर खान**

राज्य शासनासोबतची भागीद-ारी पाणी फाउंडेशनला राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचण्याची मोठी संधी देत आहे. ज्ञान, प्रशिक्षण आणि सामूहिकीकरणाच्या माध्यमातून शेतकरी कुटुंबांचे उत्पन्न आणि उत्पादकता वाढवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करू. 'फार्मर कप'ला लोकचळवळ बनवून शेतकऱ्यांची उपजीविका उंचावण्यासाठी प्रयत्नशील राहू, असे मत पाणी फाउंडेशनचे संस्थापक आमीर खान यांनी व्यक्त केले.

**'फार्मर कप' ची अंमलबजावणी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती**

राज्यात सर्व तालुके आणि गावांमध्ये 'फार्मर कप' या उपक्रमाचा विस्तार करण्यासाठी राज्य शासन पाणी फाउंडेशनला सहकार्य करणार आहे. राज्यभरात 'फार्मर कप' उपक्रमाची अंमलबजावणीसाठी कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पाणी फाउंडेशनचे संस्थापक आमीर खान, एटीई चंद्रा फाउंडेशनचे संस्थापक अमित चंद्रा, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे परिमल सिंह, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे (उमेद) मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर, पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ, अकोला येथील पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, सह्याद्री फार्म्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी विलास शिंदे, मुख्यमंत्री यांचे विशेष सल्लागार डॉ. आनंद बंग, मुख्यमंत्री कार्यालयाच्या विशेष कार्यकारी अधिकारी प्रिया खान, पाणी फाउंडेशनच्या संस्थापिका किरण राव यांची या समितीमध्ये समावेश आहे. उच्चस्तरीय समिती स्थापन झाल्यानंतर ही समिती त्यांचा पहिला कृति अहवाल तीन महिन्यात सादर करेल.

**उच्चस्तरीय समितीच्या कार्यकक्षा**

महाराष्ट्रातील प्रत्येक गावात 'फार्मर कप'चा विस्तार करण्यासाठी सविस्तर कार्ययोजना तयार करणे. शेतकरी सहजपणे सामूहिक शेती आणि शेतकरी उत्पादक संस्था (त्रझजी) स्वीकारतील यासाठी सोपी व उपयोगी कार्यपद्धती तयार करणे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे आणि शेतीवर आधारित उद्योगांमध्ये मूल्यवर्धन घडवून आणण्यासाठी शेतकरी उत्पादक संघटनांना आवश्यक साहाय्य उपलब्ध करून देणे. हवामानाशी जुळवून घेणाऱ्या शेती पद्धतीं-चा अवलंब करणे. कीटकनाशके व रासायनिक खतांचा वापर कमी करणे, तसेच सेंद्रिय व नैसर्गिक शेती पद्धतींचा प्रसार करणे. शेतकऱ्यांचा सक्रिय सहभाग वाढावा यासाठी ठोस अंमलबजावणी योजना तयार करणे. 'फार्मर कप' अंतर्गत प्रत्येक काम निश्चित वेळेत पूर्ण होण्यासाठी वेळापत्रक आखणे. अंमलबजावणी करणाऱ्या सर्व शासकीय यंत्रणांना प्रशिक्षणासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे. योजनांच्या यशस्वीतेसाठी जबाबदाऱ्या स्पष्टपणे निश्चित करणे. विविध शासकीय विभागांमध्ये सशक्त समन्वय सुनिश्चित करणे असे असेल.

**गटशेतीमुळे शेतकऱ्यांच्या नफ्यात वाढ होईल : सत्यजित भटकळ**

सन २०२२ पासून 'फार्मर कप'च्या माध्यमातून पाणी फाउंडेशन शेतकऱ्यांच्या उपजीविकेत बदल घडवून आणण्यासाठी कार्यरत आहे. यामध्ये विशेषतः अल्पभूधारक शेतकरी आणि महिला शेतकरी सक्षम होत आहेत. गटशेतीमुळे प्रति एकर लागवड खर्चात सुमारे २० टक्के बचत होईल आणि नफ्यात १०० टक्के वाढ होईल अशी आमची अपेक्षा आहे. राज्यातील प्रत्येक शेतकरी या संधीचा लाभ घेऊन आपले उत्पन्न व उत्पादकता वाढवू शकेल यासाठी आम्ही सतत प्रयत्नशील राहू, असे पाणी फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित भटकळ यांनी सांगितले.

## संपादकीय....

### फार्मर कप उपक्रम

कृषी क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, उत्पादित शेतमालाला योग्य बाजारपेठ मिळवून देणे. शेतीमध्ये उत्पादकता वाढविणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासन विविध पातळीवर अनेक उपाययोजना करत आहे. २३ मार्च २०२५ रोजी झालेल्या पाणी फाउंडेशनच्या वार्षिक कार्यक्रमात संपूर्ण महाराष्ट्रात सत्यमेव जयते फार्मर कप ची घोषणा करण्यात आली. सत्यमेव जयते फार्मर कप या उपक्रमाला व्यापक स्वरूपात राबविण्यासाठी राज्य शासन पाणी फाउंडेशनला सहकार्य करेल. फार्मर कप या उपक्रमाला राज्य शासनाशी जोडल्याने कृषी क्षेत्राच्या विकासासाठी मदत होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देखील शेतकरी उत्पादक संघटना तसेच शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी अनेक ठोस पावले उचलत आहेत. विकसित महाराष्ट्र २०४७ मध्ये कृषी विकासाला अत्यंत महत्त्व देण्यात आले आहे. त्याच दृष्टीने राज्यातील हा उपक्रम देखील महत्वपूर्ण ठरेल. राज्यातील सर्व तालुके आणि गावांमध्ये राज्य शासन व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'फार्मर कप' या उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यासाठी कृषी विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य शासनाची उच्चस्तरीय समिती व पाणी फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राज्यात २०२६-२७ या वर्षासाठी १५ हजार शेतकरी उत्पादक गट तयार करून जास्तीत जास्त शेतकऱ्यांना सहभागी करून घेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पाणी फाउंडेशनने २०२१ पासून सत्यमेव जयते फार्मर कप या उपक्रमाच्या माध्यमातून ५० हजाराहून अधिक शेतकऱ्यांना शेतकरी गटात संघटित केले आहे. यापैकी जवळपास अर्धे गट महिला शेतकऱ्यांचे असल्यामुळे, हा उपक्रम महिला सक्षमीकरणासाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरला आहे. सध्या, हा उपक्रम महाराष्ट्रातील ४६ तालुक्यांमध्ये आयोजित केला जातो. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे.

# समाज कल्याण च्या माध्यमातून अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना: शिक्षणासाठी आधारस्तंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून देशाला समता, स्वातंत्र्य आणि बंधुत्व या त्रिसूत्रीवर आधारित सामाजिक एकात्मतेचा मूलमंत्र दिला. राज्यघटनेच्या कलम ४६ मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंवर्धनाची जबाबदारी राज्यावर सोपवण्यात आली आहे. या दृष्टीकोनातून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने विविध योजनांच्या माध्यमातून वंचित घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत.

सोलापूर जिल्ह्यात समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून अनुसूचित जाती व नवबौद्ध लाभार्थ्यासाठी विविध कल्याणकारी योजना राबवल्या जात आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ही शासकीय वस्तीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांसाठी नव संजीवनी ठरली आहे.

**✻ शैक्षणिक सक्षमीकरणासाठी योजनांचा आधार**

सोलापूर जिल्ह्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवासात आर्थिक अडथळे येऊ नयेत यासाठी विविध शिष्यवृत्ती योजना राबविल्या जात आहेत:



– स्कॉलरशिप योजना: चरहर उद्दढ प्रणालीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात निधी जमा केला जातो. सन २०२४–२५ मध्ये १३,९५८ विद्यार्थ्यांना ₹२४.९४ कोटींचा लाभ मिळाला.

– परराज्य शिष्यवृत्ती योजना: परराज्यात शिक्षण घेणाऱ्या १० विद्यार्थ्यांना ₹२६.१३ लाखांचा निर्वाहभत्ता.

– राजर्षि शाहू महाराज गुणवत्ता पुरस्कार: इयत्ता १० व १२ मध्ये गुणवत्ताधारक १७५ विद्यार्थ्यांना ₹८.७५ लाखांचे प्रोत्साहन.

– सैनिकी शाळा शिष्यवृत्ती: निवासी सैनिकी शाळांतील ४९ विद्यार्थ्यांना ₹७.३५ लाखांचा निर्वाहभत्ता.

**✻ डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना: शिक्षणासाठी आधारस्तंभ**

शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या, परंतु उच्च शिक्षणासाठी इच्छुक असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांसाठी ही योजना वरदान ठरली आहे. इयत्ता ११वी, १२वी तसेच व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व निर्वाह भत्त्यासाठी ₹४३,००० पर्यंतची मदत थेट बँक खात्यात जमा केली जाते.

सोलापूर जिल्ह्यातील सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाने या योजनेचा लाभ अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध माध्यमांतून जनजागृती केली आहे:

– डिजीटल बॅनर व माहितीपत्रके – आकाशवाणी व नामांकित वर्तमानपत्रांतून प्रचार – जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमध्ये थेट भेटी

या प्रयत्नांमुळे सन २०२४–२५ मध्ये एकूण ८८९ विद्यार्थ्यांना ₹३.७१ कोटींचा लाभ मिळाला आहे. ही आकडेवारी केवळ आर्थिक मदतीची नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची साक्ष देणारी आहे.

**✻ सामाजिक व आर्थिक विकासासाठी महत्त्वाच्या योजना**

सोलापूर जिल्ह्यात समाजकल्याण विभागाच्या पुढील योजनाही प्रभावीपणे राबविल्या जात आहेत:

१) रमाई आवास योजना

२६९ चौ.फुट जागेत पक्के घर बांधून अनुसूचित जाती व नवबौध्द कुटुंबांना निवारा देण्याचा उद्देश. चालू वर्षात २,२८० घरकुलांना मंजुरी.

२) कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजना

भूमीहीन व्यक्तींना १००% अनुदानावर जमीन खरेदीसाठी मदत. चालू वर्षात १ लाभार्थ्याला ०.८१ हेक्टर जमीन मंजूर.

३) तृतीयपंथीय ओळखपत्र वाटप

सामाजिक समावेशासाठी ५१ तृतीयपंथीय व्यक्तींना ओळखपत्र व प्रमाणपत्र वितरित.

४) ऊसतोड कामगार महामंडळ योजना

१७ ऊसतोड कामगारांना आर्थिक मदत.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना

१५८ नागरी व ग्रामीण वस्त्यांमध्ये मुलभूत सुविधा पुरवण्यासाठी कामांना मंजुरी.

सोलापूर जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाने केवळ योजनांची अंमलबजावणी केली नाही, तर त्या योजनांचा प्रभाव वाढवण्यासाठी जनजागृती, पारदर्शकता आणि सहभाग यावर भर दिला आहे. विशेषतः स्वाधार योजना ही सामाजिक न्यायाच्या मूल्यांना मूर्त स्वरूप देणारी आहे. ही योजना केवळ आर्थिक मदत नव्हे, तर शिक्षणाच्या माध्यमातून स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेचा मार्ग उघडणारी सामाजिक परिवर्तनाची चळवळ आहे.

**सुनील सोनटक्के**
**(जिल्हा माहिती अधिकारी, सोलापूर)**

# दर्शनासाठी हार, फुले न आणता आणले शैक्षणिक साहित्य



ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

हार-फुले वाहून, मेणबत्ती प्रज्वलित करुन भाविक दर्शन घेतात यामुळे मोठ्या प्रमाणात हार-फुले वाहिले जातात. हे हार-फुले दुसऱ्या दिवशी कुठल्याही उपयोगाचे न राहता नाशवंत होतात. ही गोष्ट आर्थिक व पर्यावरणाच्या दृष्टीने चिंताजनक आहे. याचे गांभीर्य लक्षात घेता शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान होण्यासाठी गौरी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी हार फुल न आणता वही पेन, पेन्सिल आणावे असे आव्हान भिवंडी तालुक्यातील आतकोली गावातील युवा सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांनी केले होते या आव्हानाला प्रतिसाद देत लोकसहभागातून शैक्षणिक साहित्य जमा झाले आहे.

सदर यावर्षी उपक्रमाचे पाचवे वर्ष असून , येणाऱ्या भाविकांनी येताना हार,फुले ,मोदक ,केळी न आणता शैक्षणिक साहित्य आणून सामाजिक बांधिलकी जपली आहे. माझ्या घरी गेली पाच वर्ष ही शैक्षणिक सामाजिक चळवळ चालू करून एक सामाजिक संदेश देण्याचा पर्यंत करत आहे. व दर्शनासाठी येणारे भाविकही मला मोठ्या संख्येने साथ देत असतात. सदर जमा झालेले शाळेय साहित्याचे वाटप लवकरच दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात येणार आहे. असे सामाजिक कार्यकर्ते पंकज भोईर यांनी बोलताना सांगितले. हा उपक्रम दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना पारंपरिक दृष्टिकोन बदलून सामाजिक कार्यात सहभागी होण्याची संधी देत असून शैक्षणिक चळवळ अधिक गतिमान करणाऱ्या सामाजिक उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# 'अनंत चैतन्य'च्या बाप्पाला लेझीमच्या तालात निरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हन्नूर/प्रतिनिधी : ज्ञान, समृद्धी व बुद्धीची देवता असलेल्या श्री गणरायाची गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशीपर्यंत चालणारा हा उत्सव एक चैतन्यमय आणि आनंदाचा उत्सव आहे. विद्यार्थ्यांना सांस्कृतिक परंपरांची ओळख व्हावी, सामुहिक कार्य करण्याची शिकवण मिळावी यासाठी शाळेतही गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. याच अनुषंगाने महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्य. व कनिष्ठ महाविद्यालय हन्नूर येथे हा गणेशोत्सव प्रतिवर्षी विविध उपक्रमांने साजरा केला जातो.यंदाही अथर्वशीर्ष पठन, 'अष्टविनायकाचे वैशिष्ट्य व महत्त्व कथन 'करण्यासोबतच समुहगीत गायन व चित्ररंगभरण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते व विद्यार्थ्यांना नरसिंह हा चित्रपट ही दाखवण्यात आला. शेवटी नवव्या दिवशी म्हणजे विसर्जनाच्या दिवशी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या श्री. गणेशाच्या विविध भक्तीगीतावर आधारित वैयक्तिकनृत्य, समुहनृत्यांने तसेच लेझीम नृत्याने रस्त्याच्या दुतर्फावरती थांबून पाहणाऱ्या पालकांचे, गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले अशारितीने टाळमृदंगाच्या गजरात, लेझीमच्या तालात व हलगीच्या निनादात गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशा जयघोषात प्रशालेच्या बाप्पाला निरोप देण्यात आला. हा गणेशोत्सव साजरा करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख अप्पासाहेब काळे, सहाय्यिका सौ. मल्लम्मा चपळगाव मॅडम, कलाशिक्षक राजेंद्र यंदे, धनंजय जोजन, शशिकांत अंकलगे, अब्दुलअझीझ मुल्ला, प्रा. रवींद्र कालीबत्ते, प्रा. काशीनाथ पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

### गणेशोत्सवात प्रशालेच्यावतीने विविध उपक्रम



या प्रशालेतील वैशिष्ठ्यपूर्ण उपक्रमांबद्दल संस्थेचे अध्यक्ष व आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी, संस्थेचे जेष्ठ संचालक व मार्गदर्शक मा. श्री. मल्लिनाथ कल्याणशेट्टी, प्रशालेचे माजी प्राचार्य व आधारस्तंभ मा. श्री. सिद्धेश्वर कल्याणशेट्टी, संचालिका सौ. शांभवीताई कल्याणशेट्टी, हन्नूरचे उपसरपंच व युवा नेते मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी, संचालक श्री. मल्लिकार्जुन मसुती, सी. ई. ओ. सौ. रुपाली शहा, विज्ञान विभाग प्रमुख सौ. पुनम कोकळगी,प्रशालेचे मुख्याध्यापक श्री.अशोक साखरे,पर्यवेक्षक श्री.ज्ञानदेव शिंदे यांनी समाधान व्यक्त केले.

# गारखेड येथील वार्ड क्रं ३ चे पुर्नवसन करा अन्यथा ११ स्पटेंबरपासून बेमुदत अन्यत्याग आंदोलाचा रामप्रसाद लव्हेकर यांचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुक्यातील गारखेड ग्रामपंचायत मधील वार्ड क्रं ३ मध्ये धनगर समाज वास्तव्यास असून .३० ते ४० शेतकरी.कुटूंब आजही पुर्नवसनाच्या प्रतीक्षेत आहेत.रामप्रसाद लव्हेकर यांनी बुलढाणा जिल्हाधिकारी यांना २ सप्टेंबर रोजी निवेदन दिले आहे.गारखेड धरणा जवळ वार्ड क्रं तिन मध्ये तिस ते चाळीस घरे असून ते नदिच्या काठावर बसलेले आहेत.अतिवृषठी झाली की त्या घराच्या बाजूला नदि नाल्या तुडुंब भरून धनगर वस्तीला पाण्याचा वेढा बसतो व तेथील जन जिवन विस्कळीत होऊन जाते . सातत्याने शेती पिकाचे नुकसान होते व गावातील रहिवाशांची स्थिती बिकट आहे, २००६ मध्ये अतिवृष्टी झाली असता तेंव्हा पासून गारखेड येथील वार्ड क्रं तिन ची तेव्हा पासून पुर्नवसांची मागणी सुरु आहे. गावात जाण्यासाठी रस्ता नसल्याने . वरील भागातून शेतरस्ता आहे धरण्याच्या पाण्यामुळे तो शेतरस्ता खराब झाला आहे. चिंचोली सुजलगाव .वडाळी. या गावाच्या शिवारातील पाझर तलाव असून ते गावाच्या वरच्या बाजूला येतात .

यदा कदाचित एखांदा पाझर तलाव फूटल्यास . धनगर वस्तीत चे होत्या चे नव्हते होऊन जाईल.गारखेड येथील धरण फुटण्याची फार शक्यता नाकारता येत नाही. त्या धरणाला पन्नास वर्षे होत असून.२००६ पासून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निवेदनाद्वारे सातत्याने पाठपुरावा करत असून अद्याप प्रर्यंत शासनाने कुठलीच दखल न घेतल्याने .११सप्टेंबर रोजी बेमुदत अन्यत्याग आंदोलन करणार . असल्याचे . भाजपा ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष रामप्रसाद लव्हकरे यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहेत.



**ग्रामदैवत काळ भैरवनाथ मंदिराचे सुशोभीकरण** — **डीवायएसपी प्रशांत डगळे यांच्याकडून कौतुक**

# कान्हापुरीच्या विकासात युवकांचा वाढता सहभाग आदर्शवत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

आजचा ग्रामीण युवक हा काळानुरूप बदल स्वीकारत आहे. अनेकजण विविध परीक्षांमध्ये चमकताना दिसतात. तरी ग्रामीण भागात मार्गदर्शन पायाभूत सुविधांचा कमतरता खूप मोठ्या प्रमाणात आहे. हीच जरी शेतकरी कुटुंबातील युवकांना सतावत असते. त्यासाठी आपण काहीतरी केले पाहिजे, या विचाराने समाजकार्य करण्यामागे पुढाकार घेण्यात युवकांचा वाढता सहभाग, आदर्शवत असल्याचे प्रतिपादन पंढरपूर विभागाचे पोलीस उपाधीक्षक प्रशांत डगळे यांनी केले.

पंढरपूर तालुक्यातील कान्हापुरी गावात मुंबई येथील उद्योजक संदीप वर्तक यांचे संकल्पनेतून ग्रामदैवत काळ भैरवनाथ मंदिराचे सुशोभीकरण युवक नेते नानासाहेब शिंदे यांनी स्वखर्चातून केले. यावेळी आयोजित समारंभात कार्यक्रमात डगळे बोलत होते, ग्रामदैवत काळ भैरवनाथ मंदिर प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी करकम पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर कुंजीर हेही होते.

### गावाच्या विकासासाठी दडपड राहणारच: नानासाहेब शिंदे

**कान्हापुरी या छोट्याशा गावचा चौफेर विकास करण्यासाठी माझी कायम धडपड राहणार आहे. यासाठी मला मुंबईतील उद्योजक संदीप वर्तक यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभत आहे. आतापर्यंत मी कोणतेही राजकीय पाठबळ नसताना गावच्या सामाजिक कार्यामध्ये युवकांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रयत्नशील असून भविष्यातही आरोग्य शैक्षणिक पाणी या सुविधांसाठी सतत प्रयत्न करणार आहे ग्रामदैवत काळ भैरवनाथ मंदिर परिसरात आणि गावातील मुस्लिम कब्रस्तान परिसरात विद्युत रोषणाई मी स्वखर्चातून केले आहे असे कान्हा पोरीचे हा युवा नेतृत्व नानासाहेब शिंदे यांनी यावेळी सांगितले.**

यावेळी कान्हापुरी गावातील युवा नेतृत्व नानासाहेब शिंदे, माजी सरपंच मोतीराम गोसावी, माजी सरपंच स्मिता पाटील मॅडम, प्रेम चव्हाण, सागर पाटील, प्रवीण चौगुले, युवराज चव्हाण, सोमनाथ शिंदे , दादासाहेब शिंदे मदन गोसावी पिंटू शिंदे रामचंद्र कांबळे बालाजी पाटील बालाजी लोहार आप्पा शिंदे संग्राम बामणे हरी पवार रशीद देशमुख भारत शिंदे बनू शिंदे अजित कालेल सागर कांबळे राजाभाऊ शिंदे दत्तू नाना शिंदे भगवान खर्डे प✻✻✻ फराडे राहुल जाधव दत्तात्रय देवकर भारत आप्पा वाघमारे,काशिनाथ शिंदे, दीपक फराडेआधी उपस्थित होते.

यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते काळभैरवनाथ मंदिरात देवाची विधीमत पूजा करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. यावेळी पुढे बोलताना पोलीस उपाधीक्षक दगडी म्हणाले नानासाहेब शिंदे या युवा कार्यकर्त्यांनी कानापुरी या छोट्याशा गावात समाजकार्य करण्यासाठी घेतलेल्या पुढाकार हा आदर्शवत असून, त्यांनी गावच्या शैक्षणिक आरोग्य समस्या सोडवण्याचा



प्राधान्य देणे आवश्यक आहे कोणतीही राजकीय पाठबळ नसताना केवळ स्वतः खर्च करून गावात रावीत असलेल्या उपक्रमाचा आदर्श व इतर गावातील तरुणांनी घेण्याचे आवाहन यांनी केले यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक सागर कुंजीर म्हणाले, गाववाड्यातील तरुण युवकांनी व्यसनापासून दूर राहत आपल्या गावच्या विकासामध्ये बेकरीत येऊन थोडेफार योगदान दिल्यास नक्कीच गाव प्रगतीपथावर जाण्यास मदत होणार आहे. यावेळी नानासाहेब शिंदे यांनी तब्बल तीन लाख रुपये स्वखर्चातून ग्रामदैवत काळ भैरवनाथ मंदिर परिसरातील केलेली सुशोभीकरण आणि विद्युत रोषणाई याची पाहणी उपस्थित यांनी केली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### सर्वसामान्य, गरीब, वंचित घटकांसाठी दिलासा देणारा नेक्स्ट जनरेशन जी.एस.टी सुधारणा : शिवशंकर स्वामी



अक्कलकोट : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदीजी दूरदर्शी नेतृत्वाखाली आणि वित्तमंत्री निर्मला सीतारामनजी यांच्या प्रयत्नातून सर्वसामान्य गरीब वंचित नागरिकांसाठी सोप करण्याचा मोदी सरकारचा निर्णय आहे. या सुधारणेतून १२% आणि २८% स्लॅब रद्द करू निव्वळ ५% आणि १८% स्लॅब पर्यंत आणून जनतेच भार हलका करण्याचं काम देशातील मोदी सरकारने केले आहे. महत्वाच म्हणजे आरोग्य व जीवन विमा पूर्णपणे जी.एस.टी मुक्त केले आहे याचा फायदा देशातील प्रत्येक कुटुंबाला होणार आहे. या सुधारणेमध्ये शेतकरी, वाहन, शिक्षण, मनोरंजन या सर्व गोष्टीवर कर कमी झाल्याने चडचएी ला फायदा होऊन देश आर्थिक अधिक बळकट होण्याच्या दिशेने वाटलाच करणार आहे. मोदीजींच्या नेतृत्वात भारत अधिक पारदर्शक आणि लोककेंद्रित होत आहे. या बद्दल मोदीजी आणि सरकारचे देशवासीयांच्या वतीने अक्कलकोट शहर सरचिटणीस, भारतीय जनता युवा मोर्चा शिवशंकर स्वामी यांनी आभार मानले.

### संपत कापसे यांचे निधन



**निफाड** : निफाड येथील प्रतिष्ठित नागरिक कै. संपत रामचंद्र कापसे यांचे वयाच्या ७२ या वर्षी दुःखद निधन झाले, निफाड नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ रत्नमालाताई संपत कापसे यांचे ते पती होते तर माजी नगरसेवक देवदत्त संपत कापसे यांचे ते वडील होते, त्यांनी निफाड विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन पद ही भूषविले असून विविध स्थानिक संस्थांमध्ये पदे भूषविली आहे,त्यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र हळद व्यक्त केली जात असुन त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी राजकीय, धार्मिक, सामाजिक ,क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली समर्पित केली, त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी ,भाऊ ,नातू ,असा मोठा परिवार आहे

# शासनाने काढलेल्या जीआरची इंदापुरात होळी

## आठ सप्टेंबरला इंदापूर तहसिल कार्यालयावर धडकणार ओबीसीं मोर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी :

महाराष्ट्रातील ओबीसी समाज हा गेली अनेक वर्षे मराठा समाजाच्या पाठीशी उभा राहिला,त्यामुळेच मराठा समाजाचे सर्वात जास्त मुख्यमंत्री होऊ शकले.

ओबीसींमध्ये पहिल्याच साडे तीनशे पेक्षा जास्त जाती आहेत. त्या जातींना अजून पुरेसे प्रतिनिधित्व मिळाले नाही.त्यात पुन्हा एक मोठा वर्ग तुम्ही जर ओबीसी मध्ये समाविष्ट करत असाल तर हा मूळ ओबीसी वर अन्याय असल्याचे म्हणत,मराठा आरक्षणासंदर्भात २ सप्टेंबर रोजी महाराष्ट्र शासनाने जो जी.आर काढला आहे त्या जी.आरची होळी करून इंदापूरात पांडूरंग (तात्या) शिंदे यांचे नेतृत्वाखाली ओबीसींनी पुन्हा एल्गार पुकारला.

**इंदापुरात पांडूरंग शिंदे यांचे नेतृत्वाखाली ओबीसींचा एल्गार**

शासनाच्या या कुटील धोरणाच्या निषेधार्थ आठ सप्टेंबर रोजी इंदापूर तहसिलवर ओबीसींचा विराट मोर्चा काढण्यात येणार असुन शासनाच्या धोरणाचा निषेध करण्यात येणार असल्याची माहिती पांडूरंग (तात्या) शिंदे यांनी इंदापूर येथील संत सावता माळी सांस्कतिक मंगल कार्यालयामध्ये आयोजित ओबीसी मेळाव्यात बोलताना दिली.याप्रंगी ओबीसी नेते पोपट पवार, माजी नगरसेवक महादेव शिंदे,माजी नगरसेवक सलीम शेख,किरण गोफणे, अप्पा माने,शिवाजी सातव ,राजकुमार राऊत,दिगांबर राऊत, कांतिलाल शिंदे, प्रकाश पवार, गोकुळ व्यवहारे, राजाभाऊ गार्डे यांचेसह मोठ्या प्रमाणात ओबीसी बांधव उपस्थित होते.



पांडूरंग शिंदे पुढे बोलताना म्हणाले की भारतीय राज्यघटने मध्ये सामाजिक राजकीय न्यायाची तरतूद आहे. उद्या जर मराठा बांधव कुणबी प्रमाणपत्र घेऊन ओबीसी मध्ये आले तर ओबीसी मधून सरपंच, जि.प.

सदस्य, नगरसेवक, पंचायत समिती सदस्य तेच होतील मग ओबीसी बांधवांना राजकीय न्याय कसा मिळेल ओबीसी फक्त मतदानापुरतेचं शिल्लक राहतील.सगे सोयरे किंवा सरसगट हा आरक्षणाचा निकष नसून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास हा आरक्षणाचा निकष आहे. या निकषानुसार मराठा समाज ओबीसी आरक्षणासाठी पात्र होतं नाहीये. तरी देखील शासनाने जो जी. आर काढला आहे तो त्वरित रद्द करावा.

ओबीसीं नेते छगन भुजबळ यांचे नेतृत्वाखाली गेल्या वर्षी महाराष्ट्रात ओबीसी आरक्षण बचाव मेळावे व आंदोलणे झाली.बारा बलुतेदार व ओबीसींना न्याय देण्यासाठी छगन भुजबळ सतत संघर्ष करत असताना त्यांच्या विरोधात खालच्या पातळीवर बोलता,अपशब्द वापरता, वेडेवाकडे बोलता हे योग्य नाही.आम्ही ७० ते ८० टक्के असुनही आम्ही तुमच्या लोकांना कधीही वेडेवाकडे बोलत नाही, तरीसुद्धा यांची जिभ नेहमीच घसरत आहे. आगामी काळात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,अजित पवार, एकनाथ शिंदे यांनी ओबीसीं चा वाचार न केल्यास यांना सत्तेवरून खाली खेचल्या शिवाय राज्यातील ओबीसी गप्प बसणार नाही याची शासनाने वेळीच दखल घ्यावी.

आमची शासनाला विनंती आहे की त्यांना दहा टक्याऐवजी वीस टक्के आरक्षण द्या,त्याबाबत आमची हारकत नाही.परंतु ओबीसीमधुन आरक्षण देवु नये ही आमची मागणी आहे.ओबीसींच्या लेकराबाळांचे शैक्षणिक,राजकीय,सामाजिक आरक्षन जर कोणी घेत असेल तर महाराष्ट्रातील ओबीसी समाज कधीच गप्प बसणार नाही.याची शासनाने दखल घ्यावी, अन्यथा पिवळ वादळ लाखोंच्या संखेने मुंबई मंत्रालयामध्ये घुसले तर सरकारची पळता भुई थोडी होईल यांची शासनाने दखल घेवुन ओबीसींच्या मागण्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा असे पांडुरंग (तात्या) शिंदे म्हणाले.

# अकलूज पोलिसांची कारवाई; पोलीस ठाणे हद्दीतील चोरी गेलेल्या तीन मोटरसायकली पोलिसांनी केल्या जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

अकलूज पोलीस ठाणे हद्दीतील चोरीला गेलेल्या तीन मोटरसायकली जप्त केल्यास अकलूज पोलिसांची कौतुकास्पद आहे.

दिनांक ०९/०८/२०२५ रोजी रात्री ०८.३० सुमारास हरी नगर माळीनगर तालुका माळशिरस येथून यांची चोरीला गेली मोटरसायकल असल्याबाबत आकलून पोलिसांना ठाणे येथे आणण्यात छोट्याविरुद्ध तक्रार दिलेली होती. अकलूज पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ५१२/२०२५ बीएनएस ३०३(३) प्रमाणे गुन्हा दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल १०९८ व्ही बी घाडगे हे करीत आहेत अकलूज पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकातील पो हेड कॉन्स्टेबल १०९८ घाडगे पोलीस हेड कॉन्स्टेबल १५६ साले,पो.को./५१मा. हे अकलूज शहरात पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की पंचवटी येथील एक ही समना मे शंकर सुनील डांगे यांच्याकडे चोरी या गाड्या आहेत अशी माहिती मिळाली मिळाली असता शंकर सुनील डांगे याला ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी खालील प्रमाणे वाहने काढून दिली.



१) अकलूज पोलीस ठाणे गडील गुन्हा रजिस्टर नंबर ५१२/२०२५ मधील एक होंडा ड्रीम योगा कंपनीची मोटरसायकल आरटीओ एम एच ४५ ही ४६ ५१ असा असलेली जु.वा. २) अकलूज पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १६१/२०२५एक होंडा कंपनीची युनिकॉर्न क*** रंगाची मोटरसायकल तिचा आरटीओ नंबर एम एच ४५ ए जी १८८३ असा असलेली जु.वा. ३) धाराशिव इथून चोरलेली एक टीव्हीएस कंपनीची अपाचे काळा रंगाची मोटरसायकल तिचा आरटीओ क्रमांक एम एच २५ प्स ०१५३ असा असलेली गु.वा.

## निंगप्पा निंबाळ यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील सिन्नूर गावामध्ये गणरायाचे स्थापन मंडळ चे आयोजित करण्यात आले. यावेळी श्री शांत लिंगेश्वर गणेश मित्र मंडळ सिन्नूर गणेश उत्सव मंडळाच्या वतीने, अक्कलकोट तालुक्यातील दुधनी बिट मधील पत्रकार बांधवांच्या शुभहस्ते, श्री ची महाआरती व अभिषेक ठेवण्यात आली होते. याप्रसंगी दैनिक यश सिद्धी न्युज दुधनी प्रतिनिधी निंगप्पा निंबाळ यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी उत्सव अध्यक्ष अनिल जेवर्गी ,शिवराज सोन्नदा संगमेश जेवर्गी मंजु सोन्नदा मल्लू सोन्नदा बसवराज शकपुरे गणपती उजनी भुताळी कळसगोंडा , श्री शांतिलिंगेश्वर गणेशोत्सव मंडळाचे सर्व पदाधिकारी गवतील नागरिक पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जगतापवाडी शाळेच्या मिना म्हसे यांना जिल्हा पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनिधी

जगतापवाडी शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका व औषधी वनस्पती पुस्तकाच्या संपादिका मीना अशोक म्हसे - आसने यांना यावर्षीचा जिल्हा पुरस्कार जाहीर झाला आहे. शिक्षक दिनानिमित्त जिल्हा परिषदेने नुकतीच या पुरस्कारांची घोषणा केली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगतापवाडी येथे उपशिक्षिका म्हणून कार्यरत असणाऱ्या मीना अशोक म्हसे या विद्यार्थ्यांच्या संदर्भात विविध प्रकारचे उपक्रम शाळेत राबवत असतात. यात काव्य गायन, विद्यार्थी दिंडी, दहीहंडी उत्सव, गणेशमूर्ती बनवणे, परिसरातील उल्लेखनीय व्यक्तीची मुलाखत, औषधी वनस्पतींची लागवड, परिसरातील सापांची माहिती यांसारखी उपक्रम ते शाळेत सतत राबवत असतात. याशिवाय मंथन, शिष्यवृत्ती अशा स्पर्धा परीक्षांचीही तयारीही त्या शाळेत घेतात. मागील जिल्हा परिषद वढू खुर्द शाळेत त्यांनी साठ वर्षातून पहिल्यांदाच शिष्यवृत्तीची परंपरा सुरू केली; ती आजतागायत चालू आहे. तसेच विद्यार्थ्यांना औषधी वनस्पतीची माहिती होण्यासाठी शाळेत औषधी वनस्पतींची लागवड करून त्याची माहिती विद्यार्थ्यांकडून संकलित करून घेतली. त्या संपूर्ण माहितीचे त्यांनी पुस्तक संपादित केले. या त्यांच्या उपक्रमाला शिक्षण विवेक कडून शिक्षण माझा वसा हा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला आहे. तसेच या पुस्तकावर विविध नामवंत साहित्यिकांनी परीक्षण देखील लिहिले आहे. विविध वृत्तपत्रे, मासिके आणि दिवाळी अंकात त्यांचे नियमित लेखन असते. त्यांचा निरागस मने हा कथासंग्रह प्रकाशकाच्या मार्गावर आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत पुणे जिल्हा परिषदेने त्यांना यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर केला आहे.



त्यांना पुरस्कार जाहीर होताच वाबळेवाडी शाळेचे राज्य पुरस्कार प्राप्त साहित्यिक शिक्षक सचिन शिवाजीराव बेंडभर यांनी त्यांच्या राहत्या घरी जाऊन त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.

# भिमाई आश्रमशाळेत जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धा उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : इतर मागास बहुजन कल्याण विभाग पुणे अंतर्गत सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीच्या त्रिशताब्दी वर्षानिमित्त इंदापूरच्या भिमाई आश्रम शाळेत जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धेचे आयोजन सोमवारी (दि.२५) करण्यात आले होते.

मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्टच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात जिल्हास्तरीय रांगोळी स्पर्धा उत्साहात पार पडली. संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे (काकी) कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव ड.समीर मखरे व मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

यावेळी तथागत गौतम बुद्ध मूर्तीस, राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब, राजमाता अहिल्यादेवी होळकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, माता रमाबाई आंबेडकर या बहुजन महामातांच्या प्रतिमांना व इंदापूरचे माजी नगराध्यक्ष व संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत रत्नाकर मखरे (तात्या) यांच्या प्रतिमांना महिला शिक्षकांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. दीप प्रज्वलन उपस्थित शिक्षकांच्या हस्ते करण्यात आले. विविध आश्रम शाळेतून आलेल्या शिक्षकांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

परीक्षेचे परीक्षक म्हणून संदीप गोसावी (तळेगाव ढमढेरे), अश्विनी सोनटक्के (आणे) यांची नियुक्ती सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण पुणे यांनी केली होती.

स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील मुखई,तळेगाव ढमढेरे (शिरूर),वाघोली (हवेली),आणे ( जुन्नर),सोनवडी, मोरेवस्ती(दौंड),वाघळवाडी, मुर्टी मोडवे(बारामती) भोसरी(पुणे), इंदापूर आदी आश्रमशाळेतील ४७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. गट क्र.१.इ.५ वी ते ७ वी.रांगोळी विषय : स्वच्छ भारत, स्वातंत्र्य दिन, सर्व शिक्षा अभियान.गट क्र.२.इ.८ वी ते १० वी. विषय: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, हरित वसुंधरा, बेटी बचाव बेटी पढाव.गट क्र.३.इ.११ वी १२ वी. विषय : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, महिला सक्षमीकरण, मोबाईलचे व्यसन हे विषय रांगोळी काढण्यासाठी स्पर्धकांना देण्यात आले. स्पर्धेमुळे स्पर्धकांना कलात्मक कौशल्य दाखवण्याची आणि वाढवण्याची संधी मिळाली.

संदीप गोसावी यांनी रांगोळीचे महत्व सांगितले. जिल्ह्यातून स्पर्धेसाठी आलेल्या स्पर्धक व शिक्षकांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. अनिता साळवे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन नानासाहेब सानप, हिरालाल चंदनशिवे यांनी केले. आभार साहेबराव पवार यांनी मानले.

संचालक संजय कांबळे, शिल्पकार विक्रम वाघमोडे, सामाजिक कार्यकर्ते माऊली नाचण, सूरज धाईंजे तसेच जिल्ह्यातील आश्रमशाळांचे स्पर्धक, शिक्षक उपस्थित होते.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम**

**मुकुंद पत्की यांचे प्रतिपादन**

# शिक्षकांनी नवराष्ट्र निर्मिती साठी योगदान द्यावे



कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्राध्यापकांचा शिक्षक दिनानिमित्त सत्कार करण्यात आला त्याप्रसंगी मुकुंद पत्की मल्लिनाथ कल्याणशेट्टी व मान्यवर

### प्रा. सौरभ भस्मे यांचा सत्कार

**इंग्रजी विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल महाविद्यालयातील प्राध्यापक सौरभ भस्मे यांचा सत्कार प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आला, प्रा भस्मे यापूर्वी राज्यशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/अक्कलकोट :

माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात समाजाची अवस्था दोलायमान झाली आहे. विद्यार्थी मोबाईल, व्हाट्सअप, ट्विटर, फेसबुक यामध्ये व्यस्त आहे. त्याचे वाचन करण्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. त्याच्या अंगी असलेली सर्जनशील, जिज्ञासू वृत्ती, प्रयोगशीलता पुरती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे, देशी उद्योग व्यवसायाची अवस्था विचित्र झाली आहे, अशा परिस्थितीत शिक्षकांनी नवराष्ट्र निर्मितीसाठी योगदान दिले पाहिजे असे प्रतिपादन साहित्यिक मुकुंद पत्की यांनी केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाने आयोजित केलेल्या शिक्षक दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, प्रा भीम सोनकांबळे, प्रा राजशेखर पवार उपस्थित होते.

पुढे ते म्हणाले, विद्यार्थी व नागरिकांना परिवर्तनाची दिशा दाखविण्याची मोठी जबाबदारी शिक्षकांनी स्वीकारावी पाहिजे, त्यातूनच नव भारताची निर्मिती होणार आहे.

मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, विद्यार्थ्यांना तसेच समाजाला परिवर्तनाचे मार्ग शिक्षकांमुळेच दिसतात त्यामुळेच सामाजिक अभिसरण देखील जलदगतीने होते म्हणून शिक्षकांची भूमिका दिशादर्शक असावी. प्रारंभी महाविद्यालयातील शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर तमन्ना शेरीकर, शिवानंद जमादार, सिद्धाराम स्वामी, प्रा सौरभ भस्मे, प्रा मनीषा शिंदे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन पवन अंबुरे, सानिया शेख यांनी केले. आभार महादेवी नडगेरी यांनी मानले.

# उपजिल्हा रुग्णालय निफाडसह तालुक्यातील रुग्णालयात औषधांचा तुटवडा

## रुग्णांची हेळसांड तर रुग्ण नातेवाईकांमध्ये तीव्र नाराजी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/राजेंद्र थोरात

गोरगरीब जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने उपचारा साठी अति महत्त्वाचा दुवा ठरणाऱ्या उपजिल्हा रुग्णालय निफाड सह तालुक्यातील रुग्णालयात शासकीय नियमाप्रमाणे सर्व रुग्णांना मोफत उपचार केले जात असून उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना केस पेपरही मोफत दिला जातो परंतु उपचार झाल्यानंतर महत्त्वाच्या गोळ्या औषधे यांचा उपजिल्हा रुग्णालयात पुरेसा औषध साठा उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना बाहेरील मेडिकल मधून औषधे विकत घेण्याची वेळ येत आहे त्यामुळे गोरगरीब जनतेच्या खिशाला मोठ्या प्रमाणावर झळ बसत आहे ,

सध्या पावसाळ्याचे वातावरण असून अनेक रस्त्यांवर मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्यात नागरिक जखमी होत असून कुत्र्याने घेतलेल्या चाव्यामुळे रुग्णालयात उपचार घेण्यासाठी जावे लागते.

परंतु अतिमहत्वाची रेबिक्युअर लस रुग्णालयात मुबलक प्रमाणात नाही, तिला बाहेरील खाजगी मेडिकल मधून रुग्णांनांनी खरेदी केल्यास पाचशे ते सातशे रुपये पर्यंत त्याची किंमत मोजावी लागणार आहे , शहरी व ग्रामीण भागातील अनेक रुग्ण हे मोल मजुरी करणारी असल्याने ही लस बाहेरून विकत घेणे शक्य नसून ही महत्त्वाची लस रुग्णालयात पुरेशा प्रमाणात उपलब्ध होणे गरजेचे आहे ,तसेच सर्दी, खोकला, ताप, यासारख्या आजारावरील औषधांसह सलाईनचाही तुटवडा जाणवत आहे , कॅल्शियम टॅबलेट, कॅल्शियम सिरप बॉटल, पित्ताच्या गोळ्या, वेदना क्षमण मलम, यांचा तुटवडा असून रुग्णांची मोठ्या प्रमाणावर कुचंबा न होत आहे रुग्णांवर उपचार करताना अनेक अडथळे निर्माण होत आहे ,

जिल्ह्यातील उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय यांना जिल्हा रुग्णालयातून औषधांचा पुरवठा केला जातो परंतु जिल्हा रुग्णालयातच पुरेसा साठा शिल्लक नसल्याने ग्रामीण भागातील रुग्णालयांवर त्याचा परिणाम होत असल्याचे मत रुग्णालयातील कर्मचारी वर्गाकडून सांगण्यात आले आहे,

आरोग्य तज्ञांच्या मते नियमित औषध न मिळाल्यास आजारात गुंतागुंत वाढू शकते आणि रुग्णांची प्रकृती अचानक खराब होण्याचा धोका वाढतो विशेषता वृद्ध, गर्भवती महिला आणि दीर्घकालीन आजाराने पीडित रुग्णांसाठी औषधांचा तुटवडा गंभीर ठरू शकतो

तरी शासनाने रुग्णालयांना अपुरा पडणारा औषधांचा साठा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यावा जेणेकरून गोरगरीब जनतेचे उपचार घेताना हाल होणार नाही त्यांना रुग्णालयातच वेळेवर औषधे मिळतील व त्यांच्या खिशाला झळ बसणार नाही अशी मागणी रुग्णांकडून केले जात आहे ,

> **वरिष्ठ कार्यालयास औषध पुरवठ्याबाबत वारंवार लेखी व मौखिक मागणी केली जात असुन तसेच वेळोवेळी स्थानिक स्वराज्य संस्था जसे तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र येथे उपलब्ध अतिरिक्त असलेला औषधी ही मागविले जात असून स्थानिक पुरवठादार यांना उपलब्ध निधी मधून औषध खरेदीसाठी पुरवठा आदेश पारित केला आहे**
>
> **– डॉ राजीव तांभाळे (वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय निफाड)**

# खग्रास चंद्रग्रहणामुळे श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नित्योपचारात बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : खग्रास चंद्रग्रहण दि. ०७ सप्टेंबर रोजी २०२५ असल्याने श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या नित्योपचारामध्ये बदल करण्यात येणार आहे. यादिवशी रात्री ९.५७ वा.ते १.२७ वाजेपर्यंत ग्रहणाचा कालावधी आहे. ग्रहणाचे वेध दुपारी १२.३७ वाजले पासून सुरू होत असल्याने दुपारचा पोशाख व धुपारतीच्या वेळेत कोणताही बदल होणार नाही.

रात्री ९.५७ वाजता ग्रहण स्पर्श झाल्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस व मंदिरातील इतर परिवार देवतेस चंद्रभागा नदीचे पाणी आणून स्नान घालण्यात येणार आहे. तसेच ग्रहण सुटेपर्यंत म्हणजे रात्री १.३७ वाजेपर्यंत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन सुरू राहणार आहे.

ग्रहण सुटल्यानंतर ग्रहण सुटल्याचे स्नान चंद्रभागे नदीचे पाणी आणून घालण्यात येणार असून, मोक्ष झाल्यानंतर रात्री २.०० वाजेपर्यंत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन सुरू राहील व रात्री २.०० वाजेनंतर शेजारती करण्यात येणार आहे. शेजारतीनंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची विश्रांती पहाटे ५.०० वाजेपर्यंत राहणार आहे. त्यामुळे दिनांक ८ सप्टेंबर रोजी काकड आरती पहाटे ५.०० नंतर सुरू होईल व त्यानंतर नेहमीप्रमाणे नित्यपूजा होऊन दर्शन सकाळी ६.३० वाजेपर्यंत सुरू होईल याची भाविक भक्तांनी नोंद घ्यावी असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# प्रिसिजन कॅमशॉफ्टतर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास २५ आसनी बस भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : प्रिसिजन कॅमशॉफ्ट लि., सोलापूर यांच्यावतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (उडठ) उपक्रमांतर्गत एका आधुनिक व वातानुकूलित २५ आसनी बसची देणगी देण्यात आली. विद्यापीठ परिसरात आयोजित कार्यक्रमात या बसचा चावीप्रदान समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला.

यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांना प्रिसिजन कॅमशॉफ्ट लि. चे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यतीन शहा आणि प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांनी बसची चावी सुपूर्द केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी, विद्यापीठाचे प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कुलगुरू प्रा. डॉ. महानवर यांनी आपल्या मनोगतामध्ये सांगितले की, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक तसेच अभ्यासभ्रमंतीसाठी ही बस मोठा हातभार लावणार आहे. विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना स्पर्धेसाठी इतरत्र जाण्यासाठी या बसचा मोठा उपयोग होणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. बसची देणगी देण्यात

### कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी मानले प्रिसिजनचे आभार

आल्याने प्रिसिजन कंपनीचे कुलगुरु डॉ. महानवर यांनी यावेळी आभार मानले. त्याचबरोबर सोलापूर विज्ञान केंद्राला देखील प्रिसिजन फाउंडेशनने मदत करावी, असे अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

प्रिसिजनच्या सुहासिनी शहा यांनी सांगितले की, शिक्षण व सामाजिक विकास क्षेत्रात योगदान देणे ही आमची सामाजिक जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ही बस उपयुक्त ठरेल, अशी आमची खात्री



आहे. या बसच्या मदतीने विद्यापीठातील विद्यार्थ्यांना विविध अभ्यासभ्रमंती, क्रीडा स्पर्धा, संशोधन व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सोयीसुविधा उपलब्ध होतील. तसेच, विद्यापीठाचा सामाजिक व शैक्षणिक दर्जाही उंचावण्यास या उपक्रमाचा मोलाचा हातभार लागेल, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले.

यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, वित्त व लेखाधिकारी डॉ. महादेव खराडे, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत अंधारे, अधिसभा सदस्य ॲड. मल्लिनाथ शहाबादे, प्रिसिजनचे जनसंपर्क अधिकारी माधव देशपांडे, डॉ. राजेश गुराणी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. श्रुती देवळे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी केले

# पुरंदरमध्ये ओबीसी समाज बांधव एकत्र, आरक्षणाच्या संरक्षणासाठी तहसिलदार यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/पुरंदर : नुकतेच राज्य सरकारने , हैद्राबाद गॅजेट प्रमाणे मराठा बांधवांना कुणबी म्हणून ओबीसी कोट्यातुन आरक्षण देण्याबाबत घेतलेला निर्णय दुर्दैवी असून ओबीसी समाजावर अन्याय करणारा आहे, यामुळे ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण संपुष्टात येणार असून, मराठा समाजाला कुणबी म्हणून दाखले दिल्यास भविष्यात स्थानिक स्वराज्य संस्थांमधील ओबीसी प्रवर्गातील प्रतिनिधित्व संपुष्टात येईल , मराठा बांधवांना आरक्षण मिळावे यासाठी आमचा पाठिंबा आहे, परंतु त्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देऊ नये याबाबत राज्यातील सर्व तहसिलदार कार्यालयात ओबीसी नेते व राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांच्या आदेशानुसार निवेदन देण्याबाबत सुचना करण्यात आल्याने पुरंदरचे तहसिलदार विक्रम राजपूत यांना ओबीसींच्या वतीने निवेदन देण्यात आले.



यावेळी जिल्हा अध्यक्ष निलम होले, तालुका अध्यक्ष चंद्रकांत गिरमे, संजय टिळेकर, किसनराव वाघोले, यांनी विचार व्यक्त केले, यावेळी ,शितल बनकर सागर जगताप , प्रिया जगताप सचिन भोंगळे, मनोज मेहेत्रे ,स्वाती गिरमे मंगला म्हेत्रे, योगेश जांबुळकर, संतोष गिरमे आबा भोंगळे, ताजुउद्दीन शेख, नितीन राऊत , विद्या टिळेकर, विजय गिरमे, किरण कुंभार प्रल्हाद शेवते, मोमीन बागवान विजय राऊत, अजित गायकवाड अतुल लांडगे, सोमनाथ दुधाळ, नितीन भोंगळे, रोहित इनामके विजय नवले, अँड स्वाती चौखंडे, विशाल कादमाने, अँड सचिन कदम आदी मान्यवर उपस्थित होते,

# गौरी गणपती सजावट स्पर्धेची गरज

पंढरपूर/प्रतिनिधी

आपल्या सर्वांचा आवडता सण म्हणजे गौरी गणपती उत्सव आहे. आणि या उत्सवामध्ये घरात सजावट करताना जो आनंद मिळतो तो सर्वात मोठा आनंद असतो. महिलांच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी सण उत्सवाच्या वेळी होणाऱ्या घरगुती सजावटी निमित्ताने अशा स्पर्धांची गरज आहे. गौरी गणपती स्पर्धा घेणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे समाज प्रबोधन केले जाते.असे मत ग्राहक पंचायत जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी व्यक्त केले.

### शशिकांत हरिदास यांचे प्रतिपादन

पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील यशश्री अॅकॅडमीच्या येथे एलआयसी अखिल भारतीय ग्राहक पंचायत व तेज न्यूज यांच्या वतीने गौरी गणपती सजावट स्पर्धेचा बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्राहक पंचायतचे जिल्हाध्यक्ष शशिकांत हरिदास हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून एलआयसीचे विकास अधिकारी बी एस चौगुले, ग्राहक पंचायत जिल्हा उपाध्यक्ष विनय उपाध्ये, सेवानिवृत्त शिक्षक शशिकांत देशपांडे, सेवानिवृत्त तलाठी धोंडीराम शिंदे, डॉ. नवनाथ खांडेकर,प्रा. डी एस माळवदे,शहाजी जाधव व संचालक प्रवीण लिंगडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी हरिदास म्हणाले की ग्राहक पंचायत ही ग्राहकांची चळवळ असून आपले हक्क आणि कर्तव्य पार पाडत असताना आपल्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल आपण ग्राहक पंचायतच्या माध्यमातून होणारा अन्याय दूर करू शकतो.

यावेळी बी एस चौगुले म्हणाले की ,आपण एलआयसीच्या माध्यमातून ग्राहकांना बचत आणि सुरक्षितता प्रदान करतो. त्यामुळे प्रत्येकाच्या घरी एलआयसी विमा असणे ही काळाची गरज झाली आहे.

या कार्यक्रमातील विजेते पुढील प्रमाणे ज्योती शशिकांत विभुते, सविता बाळासाहेब कापसे, गीतांजली गणेश ताटे, कुसुम धोंडीराम शिंदे, आकांक्षा आनंद देशपांडे यांचा शाल, सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, गुलाब पुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती माळवदे यांनी केले



तरी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राची माळवदे यांनी केले तर आभार प्रशांत माळवदे यांनी मानले.

या कार्यक्रमास महिला विद्यार्थी शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

### डॉ.निकिताताई देशमुख यांची संकल्पना

### स्पर्धेतील विजेत्यांना पुरस्कार

# गौरी गणपती सजावट, रांगोळी व भव्य मोदक स्पर्धेस महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला: मा. आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख, पुरोगामी युवक संघटना, सांगोला यांच्यावतीने डॉ. निकिताताई देशमुख यांच्या संकल्पनेतून सांगोला विधानसभा मतदारसंघातील महिला भगिनींच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी आयोजित केलेल्या भव्य गौरी गणपती सजावट स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच भव्य मोदक स्पर्धेस महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

गौरी गणपती सजावट स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच भव्य मोदक स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ गुरुवार दिनांक ४ सप्टेंबर रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहात संपन्न झाला. व्यासपीठावर श्रीमती रतनबाई गणपतराव देशमुख, आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख, डॉक्टर निकिता ताई बाबासाहेब देशमुख, महिला सूतगिरणी चेअरमन श्रीमती




कल्पना शिंगाडे व सर्व संचालिका, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सुजाता पाटील, सौ. सुजाता नवनाथ बंडगर यांच्यासह आजी-माजी नगरसेविका, विविध कार्यकारी संस्थेचे महिला पदाधिकारी उपस्थित होते.

गौरी सजावट स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक (एलइडी टीव्ही) कविता प्रमोद डोंबे यांनी, द्वितीय क्रमांक (एअर फायर) सीमा संतोष गोंजारी यांनी, तृतीय क्रमांक (मिक्सर) निशा जयराम दौंडे यांनी तर उत्तेजनार्थ क्रमांक (पैठणी) अनुक्रमे शोभा प्रकाश टकले ,राणी दत्तात्रय चांडोले, संगीता मधुकर माळी यांनी पटकाविला.

रांगोळी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक (सोन्याची नथ) ज्योती अमोल रणदिवे यांनी द्वितीय क्रमांक (चांदीचे नाणे) सौ.अहिल्या राणी कोळेकर यांनी तर तृतीय क्रमांक (चांदीचे नाणे)सौ.साक्षी मनोज पवार यांनी पटकावला.

तळणीचे व नाविन्यपूर्ण मोदक या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक (सोन्याची नथ) स्नेहल निलेश मडके, द्वितीय क्रमांक (चांदीचे नाणे) पूनम राजेंद्र नवले यांनी तर तृतीय क्रमांक (चांदीचे नाणे) स्नेहा निवृत्ती गावडे यांनी पटकाविला.

तसेच उकडीचे मोदक या प्रकारामध्ये प्रथम क्रमांक (सोन्याची नथ) प्रियंका वैभव सपाटे यांनी, द्वितीय क्रमांक (चांदीचे नाणे) तनुजा सुधीर दौंडे यांनी तर तृतीय क्रमांक (चांदीचे नाणे) रोहिणी संजय सुरवसे यांनी पटकाविला.यशस्वी सर्व स्पर्धकांना पैठणी, सन्मान चिन्ह देण्यात आले.

मोदक स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून पंढरपूर येथील सौ.विद्या कैलास करांडे मॅडम, मंगळवेढा येथील प्रा. हर्षश्री वाघमोडे, मंगळवेढा येथील प्रा. पल्लवी भोजने व दिघंची येथील डॉक्टर सौ दिपाली गजानन मोरे यांनी काम पाहिले.

रांगोळी स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून सौ अंजली चांदणे, पंढरपूर येथील अदिती बडवे व रोहित जाधव यांनी काम पाहिले. तर गौरी सजा स्पर्धेसाठी सौ सुप्रिया देशमुख, सौ. वैष्णवी शिंदे, मोहोळ येथील श्रीमती काजल चोरे यांनी तर पंढरपूर येथील श्रीमती प्रमिला चौगुले यांनी काम पाहिले.

गौरी गणपती सजावट स्पर्धा, रांगोळी स्पर्धा तसेच भव्य मोदक स्पर्धेमुळे महिलांना आपल्या कलागुणांना एक व्यासपीठ मिळाले असून त्यांचा उत्साह द्विगुणित झाला.या स्पर्धामुळे समाजातील महिलांच्या कला आणि गुणांना अधिक प्रसिद्धी मिळाली असून महिलांना आपल्या कलागुणांचे प्रदर्शन करण्याची संधी मिळाली.

> **महिलांना कौटुंबिक जबाबदारीशी ताळमेळ साधताना संघर्ष करावा लागतो. महिलांना नेहमीच घरातील जबाबदार्या पार पाडाव्या लागत असतात.त्यामुळे त्यांच्या कलागुणांना वाव मिळत नसतो. यावर्षी गणेशोत्सवाच्या निमित्ताने महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, सन्मानाचे, मनोरंजनाचे व हक्काचे व्यासपीठ मिळावे, या हेतूने आम्ही या स्पर्धा आयोजित केल्या होत्या. यापुढेही महिलांसाठी वेगवेगळे कार्यक्रम, स्पर्धा आयोजीत करुन हक्काचे व्यासपीठ निर्माण करुन देवू.**
>
> **– डॉ.निकीताताई बाबासाहेब देशमुख**

ज्यामुळे सणाचा उत्साह अधिक वाढला असून यापुढील कालावधीत डॉ.निकीताताई देशमुख यांनी महिलांना वेगवेगळ्या स्पर्धांचे माध्यमातून व्यासपीठ निर्माण करु द्यावे अशी अपेक्षाही महिला भगिनीमधून व्यक्त करण्यात आली. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी सौ.विद्या रमेश जाधव, सौ. स्वाती राजू मगर, सौ. निता रामचंद्र ढोबळे, सौ.उर्मिला विजय राऊत, सौ. स्नेहा अवधूत कुमठेकर, सौ. वर्षा दौंडे,सौ. स्नेहल बनकर, सौ.राजश्री जाधव, सौ. कल्याणी सपाटे,सौ. जया पाटील यांच्यासह शेतकरी कामगार पक्ष व पुरोगामी युवक संघटनेच्या महिला पदाधिकारी व सदस्यांनी परिश्रम घेतले.